# अर्थशास्त्र

## बी.ए. द्वितीय वर्ष (सेमिस्टर IV)

- डॉ. प्रज्ञा बागडे

## व्यापारी अधिकोषांचा अर्थ व कार्ये
## (Meaning and Functions of Commercial Banks)

प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेत अधिकोषांना महत्वाचे स्थान असते. विकसित तसेच अविकसित अशा दोन्ही देशांमध्ये अधिकोषाची अर्थव्यवस्थेतील भूमिका अत्यंत महत्वाची असते. बँक हा शब्द मूलत: (Banco) म्हणजे बाक या शब्दावरुन आला. कारण रोममध्ये सावकार ठराविक प्रकारच्या बाकावर बसून कर्ज विषयक व्यवहार पुरे करीत असत. त्यावरुन बँक हा शब्द रुढ झाला. बँक म्हणजे पैशाच्या देण्या-घेण्याचा व्यवहार करणारी संस्था होय. थोडक्यात पैशाचे विविध प्रकारचे व्यवहार करणारी संस्था म्हणजे बँक. बँक या शब्दाला मराठीत अधिकोष म्हणतात. अधिकोष म्हणजे मोठा कोष. सामान्य माणसांच्या मते, अधिकोष म्हणजे अशी संस्था की जेथे लोक आपला अतिरिक्त पैसा सुरक्षिततेसाठी जमा करतात. तसेच व्यापारी व इतर गरजू लोक पैशाची निकड असली की या संस्थेकडून कर्जही मिळवितात यावरुन असे म्हणता येते की जेथे लोकांची जमा स्विकारली जाते व जेथून ग्राहकांना कर्जही मिळू शकते. अशा संस्थेला बँक असे म्हणतात.

### व्यापारी अधिकोषांचे मूल्यमापन (Evaluation of Commercial Bank)-

जगामध्ये बँकींग व्यवहार हे अत्यंत पुरातन काळापासून सुरु आहे परंतु आधुनिक बँक व्यवसायाचा पाया बँक ऑफ ॲम्सटरडॅमने घातला असेच म्हटले जाते. पूर्वीच्या काळात लोक आपल्या सोन्या चांदीचा मौल्यवान ऐवज व किमती वस्तू सोनारांकडे सुरक्षित रहावा या उद्देशाने ठेवीत असे. सोनार या ठेवीबद्दल पावत्या देत. सुरुवातीला या पावत्या

ऐवज परत मिळविण्यासाठीच वापरल्या जात. या सेवेबद्दल सोनार त्यांच्याकडून काही मोबदला घेत असत. कालांतराने या पावत्या ऐवज हस्तांतरित करण्यासाठी सर्रास वापरण्यात येऊ लागल्या काही कालावधीनंतर या पावत्यांचा वापर पैशासारखा नित्याच्या विनिमयासाठी होऊ लागला. त्यानंतर सोनार ऐवजांच्या ठेवींवर व्याजही देऊ लागले. आणि ऐवजांच्या मूल्यापेक्षा कितीतरी अधिक किमतीच्या पावत्याही चलनात आणू लागले. अधिकोष व्यवसायाची सुरुवात ही सोनारांच्या व्यवहारातून झाली.

आजच्या अर्थव्यवस्थेतील पैशाच्या स्वरुपाचे आकलन होण्यासाठी बँकाच्या व्यवहारांचा उत्तरोत्तर झालेल्या विकासाचे ज्ञान होणे अनिवार्य आहे. अधिकोषाच्या कार्यपद्धतीच्या आणि एकूण व्यवहाराचे स्वरुप समजून घेण्याच्या दृष्टीने बँकाच्या उगमस्थानांना अत्यंत महत्व आहे. या संदर्भात क्राऊथर या अर्थशास्त्रज्ञांच्या मते, आधुनिक अधिकोषांची बीजे तीन व्यक्ती किंवा संस्थांमध्ये आढळतात. ह्यांनाच क्राऊथर अधिकोषांचे तीन पूर्वज समजतो. १) ठेवी स्विकारणारा व्यापारी २) सावकार ३) सोनार

पूर्वीच्या व्यवहारांप्रमाणे आजही अधिकोष व्यापारासाठी भांडवल पुरवितात, हुंड्याची देवाण घेवाण करतात. सावकाराप्रमाणे अधिकोष आजही लोकांकडून ठेवी स्विकारुन दुसऱ्यांना कर्ज देतात. आणि सोनारांप्रमाणे ठेवींच्या हस्तांतरणाची सोय प्राप्त करुन देतात पण हे हस्तांतरण करतानांच स्वतःचा पैसाही निर्माण करतात. त्यामुळे ह्या तीन संस्थांना व्यापारी अधिकोषांचे पूर्वज असे म्हणता येते.

**व्यापारी अधिकोषांचा अर्थ आणि व्याख्या (Meaning and Definition of Commercial Banks)-**

१) अधिकोषाच्या विविध व्याख्या आहेत. त्या सर्वात भारतीय बँकिंग कंपनी कायद्याने केलेली व्याख्या अधिकृत, सुटसुटीत व अर्थपूर्ण आहे. “अधिकोष म्हणजे ऋण देण्यासाठी

किंवा विनियोग करण्यासाठी लोकांजवळून पैशाच्या अशा ठेवी स्विकारणे की ज्याचे शोधन मागितल्याबरोबर किंवा अन्यथा करावे लागते. किंवा ते धनादेश, ड्राफ्ट किंवा आदेशाद्वारे परत घेतले जाऊ शकतात."

वरील व्याख्येवरुन अधिकोष पुढील कामे करणारी संस्था होय.

१. ती लोकांपासून पैशाच्या ठेवी स्वीकारते.

२. ती ग्राहकांना कर्ज देते.

३. ठेवीतील काही भाग विनियोगात गुंवविते.

४. ह्या ठेवी मागितल्याबरोबर किंवा अन्यथा परत होऊ शकतात.

५. धनादेश, ड्राफ्ट इत्यादीचे अधिकोषातून पैसे मिळतात.

थोडक्यात, ग्राहकांच्या दृष्टीकोनातून अधिकोष हे पैसा सुरक्षित ठेवण्याचे व कर्ज मिळविण्याचे ठिकाण होय.

२) वॉल्टर लिफच्या मते, "बँक म्हणजे अशी व्यक्ती किंवा संस्था होय की जी लोकांच्या ठेवी स्विकारते आणि त्यांनी मागितल्यानंतर धनादेशाद्वारे परत करते."

३) डॉ. एच. एल. हार्ट यांच्या मते, "बँकर म्हणजे अशी व्यक्ती की जी आपल्या सामान्य व्यवहारात लोकांकडून पैसे स्विकारते किंवा ज्यांच्या खात्यावर पैसे जमा होतात त्यांच्याकडून धनादेश स्वीकारुन पैशाची परतफेड करते."

वरील संपूर्ण विवेचनावरुन अधिकोषाचा अर्थ पुढीलप्रमाणे अधिक स्पष्ट होतो.

इतर संस्थाप्रमाणे अधिकोष ही देखील एक संस्था आहे. ही संस्था पैशाच्या देवाण घेवाणीचे व्यवहार करते. लोक आपल्याजवळ असलेला अतिरिक्त पैसा ठेवींच्या स्वरुपात अधिकोषात ठेवतात. प्रसंगी अधिकोषातून कर्जही घेतात. जनतेकडून ठेवींच्या स्वरुपात

स्विकारलेला पैसा अधिकोष गरजू ग्राहकांना कर्ज म्हणून देण्यासाठी वापरतात. अधिकोष प्रामुख्याने ग्राहकांच्या ठेवींवर कमी दराने व्याज देतात तर कर्जावर जास्त दराने व्याज आकारतात यामुळे बॅकाना अतिरिक्त नफा प्राप्त होतो.

**व्यापारी अधिकोषांची कार्ये (Functions of Commercial Banks)-**

देशाच्या अधिकोषण पद्धतीत व्यापारी अधिकोषाचे स्थान सर्वात महत्वाचे आहे. व्यापारी अधिकोष प्रामुख्याने पुढील कार्ये पार पाडतात. या कार्याची विभागणी **i)** प्राथमिक कार्ये **ii)** दुय्यम कार्ये अशा स्वरुपात केली जातात

**i) व्यापारी अधिकोषांची प्राथमिक कार्ये (Primary Functions of Commercial Banks)-**

प्राथमिक कार्यात पुढील कार्याचा समावेश होतो.

**१) ठेवी स्विकारणे**

ठेवी स्विकारणे हे व्यापारी अधिकोषांचे अत्यंत महत्वपूर्ण कार्य आहे ग्राहकांजवळील अतिरिक्त रोख रक्कम ठेवींच्या स्वरुपात स्वीकारतात. ग्राहकही आपला पैसा सुरक्षित राहावा आणि त्याची गरज पडताच तो परत मिळावा या उद्देशाने लोक आपला पैसा अधिकोषांजवळ ठेवतात. त्यावर ग्राहकांना व्याजही मिळते.

ग्राहकांपासून जमा केलेल्या ठेवी अधिकोषाच्या दृष्टीने ग्राहकांकडून घेतलेले कर्ज होय. अधिकोषांना आपले कार्यकारी भांडवल मिळविण्याचे ठेवी हे प्रमुख साधन आहे. जमा झालेल्या ठेवींच्याच आधारावर बॅका इतरांना कर्ज रुपाने पैसा देत असतात. ठेवींवरील व्याज आणि कर्जावरील व्याज यातील फरक म्हणजे अधिकोषाचा नफा होय.

अधिकोषातील ठेवींचे प्रकार पुढीलप्रमाणे

### अ) स्थिर ठेवी (Fixed Deposits)-

स्थिर ठेवी एक महिन्यापासून ते दहा वर्षापर्यंतच्या मुदतीसाठी ठेवलेल्या असतात. म्हणून त्यांना मुदती ठेवी असे म्हणतात. या ठेवी ठेवीदारांना कालावधी निश्चित करुन ठेवाव्या लागतात. तो कालावधी पूर्ण होण्याच्या अगोदर या रकमा ठेवीदाराला खात्यातून काढता येत नाही. मुदती आधी पैसे काढावेच लागल्यास ठेवींदाराला ठेवींवरील व्याज अंशत: तरी गमवावे लागते किंवा आवश्यकता पडल्यास ठेवीदाराला या ठेवींवर कर्जपण मिळू शकते. या ठेवींची मुदत (कालावधी) तेवढी जास्त तेवढा व्याजाचा दर जास्त असतो.

### ब) चालू ठेवी (Current Deposits)-

चालू खात्यावरील ठेवी मुख्यत: औद्योगिक संस्था, मोठे उद्योगपती, व्यापारी ठेवतात. यात दिवसातून कितीही वेळा रकमा जमा करता येतात आणि काढताही येतात. ह्या ठेवी मागितल्याबरोबर परत करावयाच्या असल्यामुळे यावर जास्त प्रमाणात व्याज देत नाहीत किंवा दिल्यास अल्प व्याज देतात.

### क) बचत ठेवी (Saving Deposits)-

बचत करण्याची गरीब व मध्यम वर्गीय कुटुंबाना सवय लागावी म्हणून ह्या ठेवी अधिक आकर्षक अटीवर स्वीकारण्यात येतात. बचतीला प्रोत्साहन देण्यासाठी यावर व्याजाचा दर जास्त दिला जातो. बचत खात्याचा वापर ठेवीदाराला चालू खात्यासारखा मुक्तपणे करता येत नाही. किती रक्कम काढायची आणि किती वेळा काढायची या संबंधीचे निर्बंध ठेवीदाराला पाळावे लागतात. या निर्बंधामुळे बचत खात्यावरील ठेवींचा वापर अधिकोषांना कर्जाऊ रकमा देण्याकरीता होतो. त्यामुळे या खात्यावरील ठेवींवर अधिकोष व्याज देऊ शकतात. या खात्यातील पैसे ग्राहकाला प्रामुख्याने आठवड्यातून एकदा किंवा दोनदा धनादेशाच्या सहाय्याने काढण्याचा अधिकार देण्यात येतो.

**ड) गृहकोष ठेवी (Home Safe Deposits)-**

गरीब कुटुंबातील व्यक्तींना बचतीची सवय लागवी म्हणून अधिकोषातर्फे एक सीलबंद डब्बा दिला जात असे. ह्या सीलबंद डब्यात ग्राहक रोज आपली शिल्लक टाकू शकतो. अधिकोषाचा प्रतिनिधी आठवड्यातून एक वेळ घरी जाऊन ग्राहकाच्या समक्ष सीलबंद डब्बा उघडतो. व तेवढ्या रकमेची पावती ग्राहकाला देतो यामुळे गरीब व मध्यमवर्गीय लोकांना बचतीची सवय लागते.

**२) ग्राहकांना ऋण व अग्रिम देणे**

ग्राहकांना कर्ज पुरवठा करणे हे व्यापारी अधिकोषाचे दुसरे महत्वाचे कार्य आहे. कारण या कार्यामुळे व्यापारी व उत्पादक यांच्या विकासात एक प्रकारे मदतच केली जाते. ठेवीदारांनी ठेवलेल्या रकमेतून अधिकोष व्याजाने कर्ज देत असतात. व्याजाचा दर हा कर्जाची मुदत, रकमेची सुरक्षितता, कर्ज घेणाऱ्याची पत, विश्वासार्हता, त्याने दिलेले तारण आणि कर्जाचा वापर इत्यादी गोष्टींवर अवलंबून असते. या कर्जाऊ रकमांवरील व्याज हे अधिकोषाचे उत्पन्नाचे सर्वात महत्वाचे साधन होय.

ग्राहकांना कर्ज देतांना अधिकोष रोकड न देता फक्त धनादेश काढण्याचा अधिकार देतो त्यामुळे या कार्याद्वारे अधिकोष प्रत्यय निर्माण करुन प्रत्यय मुद्रेत भर घालू शकतात.

अधिकोष प्रामुख्याने दोन प्रकारची कर्जे देतात

अ) ऋण ब) अग्रिम – अग्रिमाचेही दोन प्रकार १. रोख प्रत्यय २. अधिविकर्ष

**अ) ऋण (Loans)-**

ज्या ग्राहकांना पैशाची गरज असते अशा गरजू ग्राहकांना ऋण खात्यावर कर्ज देण्यात येते. असे कर्ज प्रामुख्याने विशिष्ट रकमेत व विशिष्ट कालावधीकरिता दिले जाते. जुन्या कर्जाची परतफेड केल्याशिवाय नवीन कर्ज दिले जात नाही. ऋणाची अंशत: फेड झाल्यानंतर जर ग्राहकाला कर्जाची गरज असेल तर त्याला नवे ऋण मंजूर करुन दिले जाते. ऋणाच्या बाबतीत कधी कधी संपूर्ण ऋणाच्या रकमेवर व्याज आकारण्यात येते. ग्राहकाने ऋणाचा उपयोग केला असो वा नसो.

ब) अग्रिमाचे दोन प्रकार आहेत. **i)** रोख प्रत्यय **ii)** अधिविकर्ष

**i) रोख प्रत्यय (Cash Credit)-**

स्कॉटलंडमध्ये या कर्जाची सर्व प्रथम सुरुवात झाली. आपल्या भारतात ही पद्धती अत्यंत लोकप्रिय झाली आहे. या पद्धतीत व्यापाऱ्यांना मालाच्या किंवा रोख्यांच्या तारणावर एका निश्चित मर्यादेपर्यंत कर्ज दिले जाते. कर्जदार आपल्या आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी पैसा आपल्या खात्यातून काढू शकतो. जेवढी रक्कम कर्जदाराने आपल्या खात्यातून काढली असेल तेवढ्याच रकमेवर व्याज आकारले जाते. म्हणून रोख प्रत्यय पद्धती व्यापारी वर्गात अत्यंत लोकप्रिय झाली आहे.

**ii) अधिविकर्ष (Over Draft)-**

ज्यांचे अधिकोषात चालू खाते असते त्यांना ही सुविधा प्राप्त होते. जेव्हा ग्राहकांना खात्यात जमा असलेल्या रकमेपेक्षा जास्त रक्कम काढण्याची सवलत दिली जाते तिला अधिविकर्ष म्हटले जाते. अल्पकालीन अग्रिम देण्यासाठी अधिविकर्षाचा उपयोग करण्यात

येतो. रोख प्रत्ययाप्रमाणे अधिविकर्षाच्या रकमेपैकी फक्त वापरलेल्या रकमेवरच ग्राहकाला व्याज द्यावे लागते.

### ३) विनिमय - विपत्रे वटविणे (हुंड्या वटविणे) (Discounting of Bills of Exchange)-

हुंडी वटविणे म्हणजे हुंडीच्या तारणावर कर्ज देणे होय. हुंड्या उधारीच्या व्यवहारातून निर्माण होतात. त्या विशिष्ट मुदतीच्या असतात.

विशिष्ट रक्कम विशिष्ट मुदतीत फेडण्याचे ऋणकोने धनकोला दिलेले वचनपत्र म्हणजे हुंडी होय. ग्राहकाची विपत्रे वेळोवेळी वटवून खरेदी करणे. अधिकोषाचे महत्वाचे कार्य आहे. विपत्रे वटविल्यानंतर त्याची रक्कम ग्राहकाला नगदी न देता त्याच्या ठेव खात्यात जमा केली जाते समजा विशिष्ट मुदत संपण्याच्या आत धनकोला पैशाची गरज असल्यास तो ते विपत्र अधिकोषाकडे देतो. अधिकोष विपत्रावर लिहलेल्या रकमेतून ठराविक दराने व्याज कापून बाकी रक्कम कर्ज म्हणून देते. व ही रक्कम त्याच्या ठेव खात्यात जमा केली जाते. यामुळे व्यापाराला मुदतीपूर्वी विपत्राचे पैसे मिळतात व बँकेला कमिशन मिळते. प्रत्यय निर्माण करण्याच्या अधिकोषाच्या साधनापैकी विपत्र वटविणे हे महत्वाचे साधन होय.

### ii) दुय्यम कार्ये (Secondary Functions)-

भारतीय व्यापारी अधिकोषाला वरील प्राथमिक कार्यासोबत पुढील दुय्यम कार्ये ही करावी लागतात ही कार्ये दोन प्रकारची असतात.

१) प्रतिनिधी म्हणून केली जाणारी कार्ये

२) सर्वसाधारण उपयोगाच्या सेवा

**१) प्रतिनिधी म्हणून केली जाणारी कार्ये (Agency Services)-**

ज्या व्यक्तींनी अधिकोषात आपली खाती उघडली असतील त्याच व्यक्तींचा अधिकोष हा अभिकर्ता (Agency) असतो. ग्राहकांच्या सूचनेनुसार अधिकोषाला निरनिराळी कार्ये करावी लागतात ती पुढील प्रमाणे.

**अ) नियमित शोधन (Regular Payment)-**

ग्राहकांसाठी विम्याचे हप्ते भरणे, व्याज देणे, सरकारी कर देणे, विजेचे बील भरणे, टेलीफोनचे बील भरणे, मासिक वर्गणी भरणे, इत्यादी कामे ग्राहकांच्या सूचनेनुसार अधिकोष करीत असतात. ही देणी ग्राहकाच्या खात्यातून दिली जात असल्यामुळे यामुळे ग्राहकांच्या वेळेची व श्रमाची बचत होते. याबद्दल अधिकोष काही कमिशनही आकारते.

**ब) व्याज व लाभांश गोळा करणे**

लांभांश, व्याज इत्यादी रकमा ग्राहकांच्या वतीने गोळा करुन ग्राहकांच्या खात्यात जमा करण्याचे काम अधिकोष करतात.

**क) ग्राहकांची पतपत्रे गोळा करणे**

दैनंदिन व्यवहारात ग्राहकाजवळ इतर अधिकोषांवर काढलेले धनादेश, व्यापारांनी दिलेले प्रतिज्ञापत्र यांच्या रकमा अधिकोषाकडून किंवा व्यापाराकडून मिळवून देण्याच्या कामाला संग्रहण म्हणतात. ही कामे ग्राहकांच्या आदेशानुसार अधिकोषाला करावी लागतात.

**ड) ग्राहकांच्या वतीने रकमा स्विकारणे**

ग्राहकाला ज्या रकमा इतरांकडून प्राप्त होणार असतील त्या रकमीचा ग्राहकांच्या वतीने स्विकार करुन ग्राहकांच्या खात्यात जमा करणे

**इ) ग्राहकांच्या आदेशानुसार रोखे किंवा शेअर्सची खरेदी विक्री करणे**

ग्राहकाने आदेश दिल्यास अधिकोष शेअर्स, रोखे खरेदी करतो तसेच त्यांचे रोखे विकण्याची व्यवस्थाही करतो.

**फ) अन्य कार्ये**

ग्राहकांच्या सुचनेनुसार मृत्यूपत्राचे तसेच संबंधित संस्थांचे मौद्रिक व्यवहार अधिकोष करतो. यासाठी ग्राहकाकडून नियमित कमिशनही मिळते. ग्राहकाने आणखी काही सूचना दिल्यास ती कामे अधिकोष करतो.

**२) सर्वसाधारण उपयोगाच्या सेवा (General Utility Services)-**

व्यापारी अधिकोष ग्राहकांच्या उपयोगी पडण्यासाठी नियमित स्वरुपाच्या कार्यांव्यतिरिक्त अनेक कार्ये करतात ती पुढीलप्रमाणे

**अ) ग्राहकाला हमीपत्रे व प्रत्यय पत्रे**

आयात-निर्यात व्यवहारात हमी अत्यंत महत्वाची बाब असते. व्यापारी अधिकोष आपल्या खातेदारांना अशी हमी पत्रे देतात. या हमी पत्रामुळे आंतरराष्ट्रीय व्यापाराला चालना मिळते. हमीपत्र हे सामान्यपणे एका अधिकोषाने दुसऱ्या अधिकोषाला केलेल्या शिफारशीसारखे असते.

**ब) सुरक्षा संग्रह**

ग्राहकांच्या मौल्यवान वस्तू, दागिने, किमती कागदपत्रे सुरक्षित ठेवण्यासाठी अधिकोषात मजबूत लोखंडी आलमाऱ्या बसविलेल्या असतात. आलमारीतील एका खणाची

ग्राहकाला एक किल्ली दिली जाते. त्याची मुख्य किल्ली अधिकोषाकडे असते. अशा प्रकारच्या सुरक्षित संग्रहामुळे ग्राहकाच्या मौल्यवान संपत्तीचे रक्षण अधिकोष करतात.

**क) प्रवासी चेक**

लांबच्या प्रवासात किंवा जास्त कालावधीच्या प्रवासात रोख रक्कम जवळ बाळगणे धोक्याचे असते ही अडचण लक्षात घेऊन व्यापारी अधिकोष ग्राहकांना प्रवासी चेक देतात. हे चेक वेगवेगळ्या रकमांचे व वेगवेगळ्या शाखांवरील धनादेश आपल्या अधिकोषाकडून मिळतात. ज्या गावातील अधिकोषांच्या शाखेवर प्रवासी चेक काढला असेल तेथील धनादेशात नमूद केलेली रक्कम सही केल्यानंतर ग्राहकाला प्राप्त होते.

**ड) आकडेवारी गोळा करणे**

व्यापारी अधिकोष व्यापार व उद्योगांशी संबंधीत आकडेवारी गोळा करतात व ग्राहकांनी विचारल्यास विनामूल्य देतात. याचा फायदा संशोधक तसेच व्यापारी यांना होतो.

**इ) शेअर्सच्या विक्रीविषयी हमी**

अधिकोष विविध कंपन्यांच्या शेअर्स विक्रीची हमी घेतात यामुळे कंपन्यांची अंशपुंजी व ऋण लवकर स्वीकृत होते.

**फ) परकीय चलनाचे व्यवहार करणे**

देशातील अनेक मोठे व्यापारी अधिकोष परकीय चलनाचे व्यवहार करतात. रिझर्व्ह बॅंकेकडून ग्राहकाला व्यापारासाठी परकीय चलन मिळवून देण्याचे कार्य अनेक व्यापारी अधिकोष करतात.

**व्यापारी अधिकोषाची कार्ये**

i) व्यापारी अधिकोषाची प्राथमिक कार्ये

**<u>१) ठेवी स्वीकारणे</u>**

अ) स्थिर ठेवी

ब) चालू ठेवी

क) बचत ठेवी

ड) गृहकोष ठेवी

**<u>२) ग्राहकांना ऋण व अग्रिम देणे</u>**

अ) ऋण

ब) अग्रिम

i) रोख प्रत्यय

ii) अधिविकर्ष

**<u>३) विनिमय विपत्रे वटविणे</u>**

ii) दुय्यम कार्ये

**<u>१) प्रतिनिधी म्हणून केली जाणारी कार्ये</u>**

अ) नियमित शोधन

ब) व्याज व लाभांश गोळा करणे

क) ग्राहकाची पतपत्रे गोळा करणे

ड) ग्राहकांच्या वतीने रकमा स्विकारणे

इ) ग्राहकांच्या आदेशानुसार रोखे किंवा शेअर्सची खरेदी विक्री करणे

फ) अन्य कार्ये

**२) सर्वसाधारण उपयोगाच्या सेवा**

अ) ग्राहकाला हमीपत्रे व प्रत्यय पत्रे

ब) सुरक्षा संग्रह

क) प्रवासी चेक

ड) आकडेवारी गोळा करणे

इ) शेअर्सच्या विक्री विषयी हमी

फ) परकीय चलनाचे व्यवहार करणे

## अपेक्षित प्रश्न

### दिर्घोत्तरी प्रश्न

१) व्यापारी अधिकोषाची व्याख्या सांगून तिचे कार्य स्पष्ट करा.

### लघुत्तरी प्रश्न

१) व्यापारी अधिकोषाची प्राथमिक कार्ये लिहा.

२) व्यापारी अधिकोषाची दुय्यम कार्ये लिहा.